





म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा. वा.
IRBK-0106262
IRBK-0106262

# कथासरित्सागर

## वक्षराज शक्तिदेव

प्र. शं. जोशी

कथासरित्सागर : ६

# यक्षराज शक्तिदेव

प. शं. जोशी

IRBK-0106262

४० नये पैसे

वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड,
३, राउंड बिल्डिंग, काळबादेवी रस्ता, मुंबई २

प्रकाशक :

एम्. के. वोरा
वोरा ॲण्ड कंपनी,
पब्लिशर्स (प्रायव्हेट) लि०
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता, मुंबई २

किंमत चाळीस नये पैसे
पहिली आवृत्ति : १९५७
सर्वाधिकार प्रकाशकाधीन

मुद्रक :

जयंत श्रीधर टिळक,
केसरी मुद्रणालय,
५६८ नारायण पेठ, पुणे २

# प्रकाशकाचें निवेदन

व्यास व वाल्मीकि हे महाकवि आपल्या परिचयाचे आहेत. पण त्यांच्याच तोडीचा महाकवि गुणाढ्य मात्र अनेकांना माहीतहि नसतो. कालिदास, बाण, सुबंधु इत्यादि संस्कृत कवींनीं गुणाढ्याच्या 'बृहत्कथे'चा मोठा गौरवपूर्वक उल्लेख केला आहे. गोवर्धन कवीनें तर गुणाढ्याला महर्षि व्यासांचा अवतारच मानिलें आहे. गुणाढ्यानें 'बृहत्कथा' नांवाचें आपलें महाकाव्य 'पैशाची' नांवाच्या प्राकृत भाषेंत लिहिलें. पण तें इतकें लोकप्रिय झालें कीं, 'बृहत्कथामंजरी', 'कथासरित्सागर', 'बृहत्कथासंग्रह' इत्यादि अनेक संस्कृत ग्रंथ त्यावरून रचले गेले. 'बृहत्कथा' हा ग्रंथ बाराव्या शतकापर्यंत उपलब्ध होता असें अनुमान विद्वानांनीं काढलें आहे. पण त्यानंतर मात्र या महाकाव्याला दुर्दैवानें आपण पारखे झालों. गुणाढ्या-संबंधींहि विश्वसनीय ऐतिहासिक माहिती आपणांस मिळत नाहीं.

'संस्कृत साहित्य सरिता' हा प्रकाशन-संच आम्हीं गतवर्षी प्रसिद्ध केला त्यांत सर्व प्रसिद्ध संस्कृत ललित वाङ्मय संक्षिप्त कथारूपानें दिलें आहे. या आमच्या प्रकाशनाचें सर्वत्र अत्यंत उत्साहानें स्वागत झालें. भारताचें सांस्कृतिक वाङ्मयीन धन मराठी मायबोलींतून सर्वसामान्य मराठी वाचकवर्गाच्या हातीं, अल्पमूल्यांत देण्याच्या या उपक्रमाबद्दल आमच्यावर धन्यवाद-अभिनंदनांचा खरोखरी वर्षाव झाला. याबद्दल आम्ही सर्वांचे ऋणी आहोंत.

याच दृष्टीनें हें पुढलें पाऊल आम्हीं टाकलें आहे. 'संस्कृत साहित्य सरितें'त आम्हीं अनेक लेखकांचें सहकार्य घेतलें होतें. 'कथासरित्सागरा'चीं हीं दहाहि पुस्तकें मात्र श्री. प्र. शं. जोशी, एम्. ए., बी. टी., काव्यतीर्थ, व्याकरणविशारद यांनीं एकट्यांनींच अनुवादित व संकलित केलेलीं आहेत.

# कथानकाची भूमिका

वत्सराज उदयनाला नरवाहनदत्त नांवाचा एकुलता एक मुलगा होता. त्याच्या सुरक्षिततेबद्दल उदयनाला नेहमीं काळजी वाटत असे. एकदा तो वासवदत्तेसह असाच चिंताक्रान्त होऊन बसला असतां त्याचा मंत्री यौगंधरायण तेथें आला व त्याला म्हणाला, " महाराज ! आतां आपण युवराजांबद्दल कसलीहि चिंता बाळगूं नका. युवराज हे सर्व विद्याधरांचे भावी चक्रवर्ती होणार आहेत. हें सहन न होऊन कांहीं विद्याधर खवळले आहेत व युवराजांच्या वाईटावर टपले आहेत पण शंकरांच्या लक्षांत ही गोष्ट आल्यामुळें त्यांनीं युवराजांच्या रक्षणांसाठीं स्तंभक नांवाचा आपला एक गण ठेविला आहे. तो अदृश्य रूपानें येथें राहून युवराजांचें रक्षण करीत असतो. ही वस्तुस्थिति मला आतांच नारदांनीं येऊन सांगितली. " यौगंधरायण असें उदयनाला सांगत आहे तोंच एक किरीट-कुंडलें धारण केलेला व हातांत खड्ग घेतलेला दिव्य पुरुष आकाशांतून तेथें उतरला व 'आपल्या भावी चक्रवर्तीचें दर्शन घेण्यासाठीं आपण आलों आहों' असें त्यानें राजाला सांगितलें. राजानें त्याची वैयक्तिक चौकशी केली असतां त्यानें स्वतःची गोष्ट सांगितली. तीच ही शक्तिदेवाची कथा.

ही कथा 'कथासरित्सागरां'तील ५ व्या लंबकांत आली आहे. एक सामान्य जुगारी मनुष्य चिकाटीनें व निश्चयानें विद्याधरांचा राजाहि कसा होऊं शकतो हें या गोष्टीवरून स्पष्ट होतें. ही गोष्ट वाचीत असतां 'अरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक' अशा अद्भुतरम्य गोष्टींची पदोपदीं आठवण होते.

# यक्षराज शक्तिदेव

**राजकन्या कनकप्रभा**

प्राचीन काळीं भरतखंडांत 'वर्धमान' नांवाचें एक मोठें शहर होतें. त्या शहरांत 'परोपकारी' नांवाचा एक बलाढ्य राजा राज्य करीत होता. त्याची 'कनकप्रभा' नांवाची एक आवडती पट्टराणी होती. राजा अत्यंत पराक्रमी असल्यामुळें शत्रु सहसा त्याच्या वाटेला जात नसत. कोणी तसा प्रयत्न केला तर राजा त्याचा कायमचा कांटा काढून टाकी. तो मोठ्या प्रेमानें प्रजेचें पालन करीत असे. त्यामुळें त्याचें राज्य सुखानें चाललें होतें.

कांहीं वर्षांनीं कनकप्रभेनें एका सुंदर मुलीला जन्म दिला. तिच्या-पुढें रतीचें सौंदर्यहि फिकें पडलें असतें. तिचें बारसें मोठ्या थाटानें साजरें करण्यांत आलें. ती आपल्या आईचा गौर वर्ण घेऊन आली होती म्हणून तिचें नांव कनकरेखा असें ठेवलें. लहानपणींच आईवडिलांनीं तिच्या शिक्षणाची चांगली काळजी घेतली होती. त्यामुळें तिनें लहान वयांतच सर्व विद्या व कला हस्तगत केल्या. हें सर्व असलें तरी तिचा स्वभाव कांहींसा अबोल व एकलकोंडा होता. त्यामुळें ती मित्रमैत्रिणींच्या संगतींत रमून गेली, असें कधींच झालें नाहीं. तिच्या मोठेपणाबरोबर तिचें गांभीर्यहि वाढतच गेलें.

● ● ●

**कनकप्रभेचा लग्नाला नकार**

ती उपवर झाली असतां, राजाच्या मनांत तिच्या लग्नाबद्दलचे विचार सारखे येऊं लागले. राणी एकदा त्याच्या महालांत आली असतां, राजा तिला म्हणाला, "देवी ! आपल्या कनकरेखेचें लग्न करावें असें

नाहीं का तुला वाटत ? तिला अनुरूप वर कसा मिळेल, याची मला तर रात्रंदिवस सारखी काळजी लागून राहिली आहे. योग्य वयांत मुलीचें लग्न झालें नाहीं तर लोक नांवें ठेवूं लागतात. म्हणून आतांपासूनच तिच्या लग्नाचा विचार करायला हवा. ”

राजाचें हें बोलणें ऐकून राणी म्हणाली, “ महाराज ! कनकरेखेला एखादें चांगलें घर पाहून द्यावें असें माझ्याहि मनांत नेहमीं येतें. आजच तो विषय मी तिच्याजवळ काढला. तेव्हां ती निश्चयानें म्हणाली, “ आई ! मला नाहीं लग्न करायचें. तुम्ही मला कंटाळला आहांत काय ? मी जिवंत रहावें अशी जर तुमची इच्छा असेल, तर तुम्ही माझ्या लग्नाचा विचार सोडून द्या. ” तिचे हे शब्द ऐकून मला फार वाईट वाटलें. मी परोपरीनें तिची समजूत काढण्याचा यत्न केला पण व्यर्थ. शेवटीं तो विचार सोडून आपली भेट घेण्यासाठीं मी इकडे आलें. तिचा जर एवढा हट्ट तर आहे आपण तरी काय करणार ? ”

• • •

**राजाकडून समजावणी व कनकप्रभेची अट**

राणीचें हें म्हणणें राजाला मुळींच पटलें नाहीं. आपल्या मुलीच्या मनांतील वेड काढून टाकण्यासाठीं तो तडक तिच्या अंतःपुरांत गेला संधि पाहून त्यानें तिच्या लग्नाचा विषय काढला. तेव्हा ती म्हणाली, “ बाबा ! कृपा करून तूर्त तरी माझ्या लग्नाचा विचार करूं नका. ” तिचे हे उद्गार ऐकून राजा तिला म्हणाला, “ बाळे ! स्त्रीला स्वातंत्र्य नसतें हें तुला माहीत नाहीं काय ? शिवाय योग्य वयांत मुलीचें लग्न झालें नाहीं तर तिचे नातलक अधोगतीला जातात. आम्हीं अधोगतीला जावें अशी का तुझी इच्छा आहे ? आतां माझें वय झालें आहे. या वयांत राज्याची जबाबदारी वहाणें मला अशक्य होत चाललें आहे. म्हणून तुझें लग्न करावें व तुझ्या पतीवर ही जबाबदारी सोपवून या कष्टांतून मुक्त व्हावें

असें मला वाटतें. तूं नाहीं म्हणतेस त्या वेळीं आमचा विचारहि तुझ्या मनांत येत नाहीं काय ? " राजाचे हे विनवणीचे शब्द ऐकून तिचें अंतःकरण गहिंवरून आलें. आईवडिलांच्या मायेपुढें तिला माघार घ्यावी लागली. ती विवाहाला तयार झाली पण एका अटीवर. ती वडिलांना म्हणाली, " बाबा ! माझें लग्न करण्याचा तुमचा निश्चयच असेल तर माझी एक विनंति मान्य करा. ज्या कोणी ब्राह्मणानें किंवा क्षत्रियानें 'कनकपुरी' नांवाची नगरी पाहिली असेल त्याच्याशीं मी लग्न करीन. इतरांशीं लग्न करण्याचा प्रसंग आला तर मी जगूं शकणार नाहीं ही गोष्ट मात्र नक्की समजा. "

हे तिचे शब्द ऐकून राजाला त्यांतल्या त्यांत समाधान झालें. लग्नाचें नांवहि काढायला ती तयार नव्हती. आतां निदान एका अटीवर तरी ती लग्नाला तयार झाली ! त्यानें लागलीच दरबार भरवला व " कनकपुरी कोणी पाहिली आहे काय ? " असा प्रश्न केला. ती नगरी पाहिलेला एकहि मनुष्य पुढें आला नाहीं. कनकपुरीचें नांवहि कोणाला माहीत नव्हतें, तेथें ती पाहिली असण्याची शक्यता कोठून ? शेवटीं राजधानींत दवंडी पिटविण्याची त्यानें सेवकांना आज्ञा सोडली.

राजाच्या आज्ञेप्रमाणें सेवक चौकाचौकांत येऊन मोठ्यानें ढोल वाजवीत व घोषणा करीत – " ऐका हो ऐका. ज्या कोणी ब्राह्मणानें किंवा क्षत्रियानें कनकपुरी पाहिली असेल त्यानें येऊन राजाला सांगावें, म्हणजे राजा त्याला आपली कन्या व युवराजपद देईल हो ऽऽऽऽऽ " ती घोषणा ऐकून प्रत्येक नागरिक आश्चर्यचकित झाला. कोणालाहि ती नगरी माहीत नव्हती. सेवकांनीं सर्व राजधानींत दवंडी पिटवली पण कोणीहि नागरिक राजाकडे आला नाहीं. त्यामुळें राजाला फार वाईट वाटलें. तथापि दररोज ती घोषणा करण्याची राजानें आज्ञा दिली.

● ● ●

## शक्तिदेवाची तयारी

शक्तिदेव नांवाचा एक ब्राह्मणपुत्र त्या राजधानींत रहात होता. मदनालाहि लाजवील असें त्याचें रूप होतें. त्याचें बोलणेंचालणेंहि रुबाबदार होतें. त्यामुळें कोणावरहि त्याची छाप पडत असे. पण लहान-पणींच वाईट मित्रांच्या संगतीमुळें तो व्यसनी बनला होता. सुरुवातीस त्यानें जुगारांत बरीच कमाई केली. पण पुढें मात्र त्याच्या दैवाचे फांसे उलटे पडूं लागले. मिळविलेला सर्व पैसा तो गमावून बसला. वडिलांकडून पैसे मिळेनात तेव्हां तो चोरी करूं लागला. त्यामुळें वडिलांनीं त्याला घराबाहेर काढलें. तेव्हां बनवाबनवी करून तो लोकांकडून पैसे उकळूं लागला. अशा रीतीनें तो आपल्या आयुष्याचा एक एक दिवस कंठूं लागला.

तो एकदा रस्त्यानें चालला होता. त्या वेळीं राजाच्या सेवकांनीं केलेली ती घोषणा त्यानें ऐकली. तो मनाशीं म्हणाला, " माझ्याजवळ आतां एक दिडकीहि शिल्लक नाहीं. स्वतःच्या घरीं मला प्रवेश नाहीं. एखाद्या मित्राकडे जावें तर आपल्या सांवलीलाहि उभा रहायला कोणी मित्र तयार नाहीं. तेव्हां आपण कनकपुरी पाहिली असें राजाला दडपून सांगावें. ज्या अर्थी दवंडी पिटविली जाते, त्या अर्थी राजदरबारांत ती कोणालाहि माहीत नाहीं हें नक्की. तेव्हां आपली थाप पचेल. तसें झालें तर राजकन्या आपली पत्नी होणार व या देशाचें राज्यहि आपल्याला बक्षिस मिळणार. " या विचारानें क्षणभरच त्याच्या मनाचा गोंधळ झाला पण मनाचा हिय्या करून तो तसाच राजवाड्यांत आला.

● ● ●

## शक्तिदेवाची फजीती

तो आल्याची वर्दी द्वारपालानें राजाला दिली. राजानें त्याला आपल्या महालांत बोलावून घेतलें. त्यानें राजाला लवून अभिवादन केलें व " महाराज ! मी कनकपुरी पाहिली आहे " असें निर्भयपणें राजाला

सांगितलें. इतक्या आत्मविश्वासानें तो बोलत होता कीं तो खोटें सांगत असेल अशी शंकाहि राजाला आली नाहीं. राजानें त्याच्याकडे निरखून पाहिलें. त्याचा सुंदर व रुबाबदार चेहरा पाहून राजाला मनांतून आनंद झाला. त्यानें सेवकाबरोबर शक्तिदेवाला कनकरेखेच्या महालांत पाठविलें.

आपली थाप पचली या कल्पनेनें शक्तिदेव अगदीं खुषींत होता. मोठ्या रुबाबांत त्यानें कनकरेखेच्या महालांत प्रवेश केला. कनकरेखा एका कोचावर बसली होती. तो आलेला पाहून ती अदबीनें उठून उभी राहिली. तिच्या चेहऱ्यावर उत्सुकता व जिज्ञासा यांचें गोड मिश्रण दिसत होतें. सेवकानें त्याची ओळख करून दिली, तेव्हां तिनें विचारलें, ' खरेंच आपण कनकपुरी पाहिली आहे काय ? ' तेव्हां शक्तिदेव लागलीच म्हणाला, " होय. मी विद्यार्थीदशेंत ती नगरी पाहिली आहे. कांहीं दिवस मी त्या नगरींत राहिलोंहि होतों." त्याचें हें उत्तर ऐकून कनकरेखेनें आश्चर्यानें विचारलें, " कोणत्या मार्गानें आपण त्या नगरीला गेलां व ती नगरी आहे तरी कशी सांगाल का मला ? " कनकरेखा अशा तऱ्हेचा प्रश्न विचारील अशी त्याला कल्पनाहि नव्हती. तो क्षणभर गांगरला पण आपल्या मनांतील गोंधळ बाहेर न दाखवितां तो म्हणाला, " येथून जवळच हरिपूर नांवाचें एक शहर आहे. प्रथम मी तेथें गेलों. तेथून प्रवास करीत करीत मी वाराणसीला गेलों. कांहीं दिवस वाराणसींत काढले व पुढें पुनः प्रवास करीत मी पौंड्रवर्धन नांवाच्या एका सुंदर शहरांत आलों. तेथून मी कांहीं मित्रांबरोबर कनकपुरीला गेलों. इतकी सुंदर नगरी मी आतांपर्यंत कुठेंच पाहिली नाहीं. इंद्राच्या राजधानीपेक्षांहि तिचें सौंदर्य व वैभव श्रेष्ठ आहे. कांहीं काळ त्या नगरींत मी विद्याभ्यास केला व नंतर कांहीं दिवसांनीं मी स्वदेशीं परतलों. " शक्तिदेवाची ही बनवाबनवी कनकरेखा शांतपणें ऐकून घेत होती. त्याचें भाषण संपल्या-वर ती हंसत हंसत म्हणाली, " आपण ती नगरी खरोखरीच पाहिली

आहे असें दिसतें. मला त्या नगरीला जायची फार इच्छा आहे. तेव्हां त्या नगरीचा मार्ग आपण पुनः सांगाल का ? " कनकरेखेचे ते शब्द ऐकून शक्तिदेवाचा आनंद गगनांत मावेना. तो अधिक उत्साहानें तो मार्ग पुनः सांगूं लागला. त्याची ती धिटाई पाहून राजकन्येला फारच आश्चर्य वाटलें. त्याच्या खोटेपणाबद्दल तिला रागहि आला. सेवकाकरवीं गचांडी देऊन तिनें शक्तिदेवाला आपल्या महालाबाहेर हांकलून काढलें व ती थेट आपल्या वडिलांकडे आली.

राजानें तिला पहिलाच प्रश्न टाकला, " काय ग ! काय ठरलें ! आहे ना तुला शक्तिदेव पसंत ? " तें ऐकून कनकरेखा त्यांना म्हणाली, " बाबा ! किती हो तुम्ही भोळे ? कोणीहि यावें आणि तुम्हांला फसवावें ! त्या भामट्यानें तुम्हांला शुद्ध थाप मारली. माझ्याहि पुढें तो धडधडीत खोटें सांगत होता. शेवटीं सेवकाकडून मी त्याला हांकलून दिलें. " कनकरेखेचे हे शब्द ऐकून राजा खजिल झाला. अपेक्षा भंग पावल्यामुळें त्याला फार वाईट वाटलें. त्यानें लग्नाच्या बाबतींत कनकरेखेचें मन वळविण्याचा खूप प्रयत्न करून पाहिला. पण तिचा निश्चय बदलला नाहीं. शेवटीं राजाला एकच मार्ग राहिला. त्यानें आपल्या राज्यांत सगळीकडे दररोज दवंडी पिटविण्याची आज्ञा दिली. किती तरी दिवस ती घोषणा होत होती. पण कनकपुरी पाहिलेला एकहि मनुष्य त्याला येऊन भेटला नाहीं.

● ● ●

## शक्तिदेवाची अनुकंपनीय अवस्था व प्रतिज्ञा

इकडे कनकरेखेनें हांकलून दिलेल्या शक्तिदेवाची अवस्था मोठी विचित्र झाली होती. ' राजकन्या व राज्य आपल्याला मिळणार ' या मनोरथांत तो दंग असतांनाच राजकन्येनें त्याला अर्धचंद्र दिला. मनोरथांनीं गांठलेल्या वैभवाच्या शिखरावरून तो निराशेच्या खोल दरींत कोसळला. राजकन्येच्या सौंदर्यानें मात्र त्याला क्षणांत वेडा बनविलें होतें.

पण प्रत्यक्ष कनकपुरी पाहिल्याशिवाय कनकरेखा आपल्याला मिळणार नाहीं याची त्याला खात्री पटली. म्हणून कनकपुरी शोधण्यासाठीं सगळी पृथ्वी पालथी घालावयाची असें त्यानें ठरविलें. ' राजकन्या मिळवीन; नाहीं तर मृत्यूला कवटाळीन ' अशी प्रतिज्ञा करून तो कनकपुरीच्या शोधासाठीं वर्धमान नगरांतून बाहेर पडला.

• • •

## शक्तिदेवाच्या प्रवासास सुरुवात

प्रवास करीत करीत तो दक्षिणेकडील विंध्य पर्वतावर आला. तेथील निबिड अरण्यांत दिवसाढवळ्या वाघसिंहासारखीं हिंस्र श्वापदें संचार करीत होतीं. त्या अरण्यांतून संचार करणें म्हणजे मृत्यूच्या दाढेंत उडी घेण्यासारखें होतें. वेळेवर कंदमुळें व फळें मिळतीलच अशी खात्री नाहीं. त्यामुळें अनेकदा उपवासहि घडत. उन्हाळ्यानें बहुतेक झरे आटल्यामुळें तहानेनें जीव व्याकूळ होऊन जाई. अशा स्थितींत एके दिवशीं त्याला त्या अरण्यांत एक विशाल सरोवर दिसलें. तें सरोवर पाहूनच त्याची तहानभूक हरपली. तो त्या सरोवरांत खूप वेळ डुंबला. स्नान करून वर आल्यावर त्याच्या इतक्या दिवसांच्या प्रवासाचा शीण नष्ट झाला. त्यानें आसपास दृष्टिक्षेप केला. त्याला उत्तरेकडील तीरावर एक आश्रम दिसला. तो तेथें गेला. एका अश्वत्थाच्या वृक्षाखालीं एक वृद्ध तपस्वी त्याच्या दृष्टीस पडला.

• • •

## 'सूर्यतप' मुनीची भेट

त्या मुनीचें नांव सूर्यतप असें होतें. अनेक मुनि त्याच्यापुढें मंडलाकार बसले होते. त्यांच्यांत तत्त्वज्ञानावर चर्चा चालू होती. शक्तिदेवानें जवळ जाऊन सूर्यतप मुनीला वंदन केलें. मुनीनींहि त्याचें योग्य तें स्वागत करून त्याची विचारपूस केली. आपली माहिती थोडक्यांत सांगून

शक्तिदेव म्हणाला, " कनकपुरीच्या शोधासाठीं मी वर्धमान शहरांतून बाहेर पडलों आहें खरा. पण ती नगरी कोठें असेल याची अंधुकशी कल्पनाहि मला नाहीं. आपण मला त्या बाबतींत मदत करावी अशी माझी आपणांस विनंति आहे." तें ऐकून सूर्यतप मुनि सहानुभूतीच्या स्वरांत म्हणाला, " बाबारे! आठशें वर्षें मी या आश्रमांत रहात आहें. पण आतांपर्यंत मी या नगरीचें नांवहि पूर्वी कधीं ऐकलें नाहीं." मुनीचे हे शब्द ऐकून शक्तिदेवाची फार निराशा झाली. अत्यंत खेदानें तो म्हणाला, " महाराज, या नगरीच्या शोधांत भटकत असतां, पाय तुटून पडण्याची वेळ आली आहे. मी असाच भटकत राहिलों तर कांहीं फार काळ जगूं शकणार नाहीं." त्याचे हे निराशेचे शब्द ऐकून मुनीला त्याची दया आली व तो त्याला म्हणाला, " इतका जर तुझा निश्चय असेल तर मी सांगतों तसें कर. येथून तीनशें कोसावर कांपिल्य नांवाचा एक देश आहे. तेथें उत्तर नांवाचा एक मोठा पर्वत आहे. त्या पर्वतावर एका आश्रमांत दीर्घतप नांवाचा माझा वडील भाऊ रहात असतो. तो माझ्यापेक्षां वयानें बराच मोठा असल्यामुळें कदाचित् त्याला ती नगरी माहीत असेल. तेव्हां तिकडे जाऊन तूं त्याला विचार." तें ऐकून शक्तिदेवाला आशेचा किरण दिसूं लागला. त्यानें ती रात्र त्याच आश्रमांत काढली व दुसरे दिवशीं पहांटे उठून तो पुढच्या प्रवासास निघाला.

• • •

## 'दीर्घतप' मुनीकडे आगमन

वाटेंत शेंकडों अडचणींना तोंड देत तो कसाबसा कांपिल्य देशांत आला. इतक्या लांबच्या प्रवासामुळें अधिक चालण्याचें त्राण त्याला उरलें नव्हतें. तरी देखील दृढ निश्चयानें तो 'उत्तर' पर्वत चढून एका आश्रमांत आला. सुदैवानें त्याला अधिक भटकावें लागलें नाहीं. शक्तिदेवानें तेथें चौकशी केली. दीर्घतप मुनि त्याच आश्रमांत रहात होता. जवळ

जाऊन शक्तिदेवानें मुनीचे पाय धरले व आपली सर्व हकीगत सांगून तो म्हणाला, " आपल्या बंधूंनीं मला आपणाकडे पाठविलें आहे. तरी कृपा करून आपण मला कनकपुरीबद्दल माहिती सांगा. " त्याची सर्व हकीगत ऐकून दीर्घतपाला फार वाईट वाटलें. तो खेदानें शक्तिदेवाला म्हणाला, " बाळा ! तूं इतके कष्ट घेऊन येथें आलास खरा, पण तुझ्याच तोंडून मी कनकपुरीचें नांव आज प्रथम ऐकत आहें. ती नगरी दुसऱ्या कुठल्या तरी लांबच्या द्वीपावर वसलेली असावी. ती शोधण्याच्या बाबतींत मी तुला एक उपाय सुचवितों. पटला तर पहा. " असें म्हणून तो पुढें सांगूं लागला, " समुद्रामध्यें उत्स्थल नांवाचें एक द्वीप आहे. तेथें सत्यव्रत नांवाचा कोळ्यांचा एक राजा आहे. त्याचें दुसऱ्या द्वीपांना नेहमीं जाणें येणें असतें. त्यामुळें त्यानें कदाचित् ती नगरी पाहिली असेल. तेव्हां तूं त्याच्याकडे जा व चौकशी कर. "

आतांपर्यंतच्या प्रवासांत शक्तिदेवाची सर्व शक्ति क्षीण होत चालली होती. अधिक प्रवास करणें त्याच्या अगदीं जिवावर आलें होतें. पण मुनीच्या बोलण्यावरून त्याला पुनः आशा सुटली. त्याला आपली प्रतिज्ञा आठवली. ' प्रतिज्ञेंत हरलों ' म्हणून मरण्यापेक्षां प्रयत्न करीत असतां मरण आलेलें बरें असा त्यानें मनाशीं विचार केला. तो मुनीला म्हणाला, " महाराज ! उत्स्थल द्वीपाला जाण्याचा मार्ग तरी आपण मला सांगावा. " तेव्हां दीर्घतप त्याला सांगूं लागला, " बाळा ! येथून तूं प्रथम पूर्वसमुद्राच्या किनाऱ्यावर वसलेल्या 'विटंकपुर' नांवाच्या शहरांत जा. तेथें उत्स्थल द्वीपाला जाणाऱ्या अनेक नौका असतात. तेथील एखाद्या व्यापाऱ्याशीं संधान बांध व उत्स्थल द्वीपाला जा. तेथें सत्यव्रताला विचार, म्हणजे तुला हव्या असलेल्या नगरीचा शोध लागेल. " मुनीला वंदन करून शक्तिदेव पुढच्या प्रवासाला चालला. मुनीनें दिलेल्या आशीर्वादाच्या

जोरावर पुनः अनेक संकटांना तोंड देत शेंकडों मैल चालून तो समुद्र-किनाऱ्यावरील विटंकपुरांत आला.

● ● ●

## समुद्रदत्ताशीं मैत्री

तेथें त्यानें चौकशी केली. तेव्हां समुद्रदत्त नांवाचा एक व्यापारी उत्स्थल द्वीपाला जाणार आहे अशी माहिती त्याला मिळाली. त्यानें समुद्र-दत्ताचा शोध केला व त्याच्याशीं मैत्री जोडली. शक्तिदेवाचा धाडसी स्वभाव समुद्रदत्ताला फार आवडला. त्यानें शक्तिदेवाला आपल्या बरोबर उत्स्थल द्वीपाला न्यायचें ठरविलें. एके दिवशीं योग्य वेळ पाहून ते प्रवासास निघाले.

● ● ●

## शक्तिदेवाचा समुद्रप्रवास व वादळाचा तडाखा

पहिले दोन दिवस त्यांचा प्रवास मजेंत झाला. समुद्रदत्त शक्ति-देवाची अत्यंत आपुलकीनें चौकशी करीत असे. त्याचें आपल्यावरील अकृत्रिम प्रेम पाहून शक्तिदेवाचें अंतःकरण कृतज्ञतेनें भरून येई. तिसरे दिवशीं संध्याकाळच्या सुमारास ते नौकेच्या कठड्यावर गप्पा-गोष्टी करीत उभे होते. त्यांच्या गप्पा रंगांत आल्या होत्या. इतक्यांत एक खलाशी भीत भीत तेथें आला व समुद्रदत्ताला म्हणाला, "मालक ! पश्चिम दिशेला काळे कभिन्न ढग आकाशांत थैमान घालूं लागले आहेत. ते प्रचंड वेगानें आपल्याच दिशेनें येत आहेत." तो असें सांगत आहे इतक्यांत वाद-ळाचीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं. सोसाट्याचा वारा सुटला. क्षणभरांत सगळें आकाश मेघांनीं झांकून टाकलें. विजांचा कडकडाट होऊं लागला. लाटांबरोबर त्यांची नौका हेलकावे खाऊं लागली. क्षणांत ती नौका उसळणाऱ्या लाटेबरोबर अंतराळांत उंच जाई, तर दुसऱ्याच क्षणीं ती समुद्राचा तळ गांठण्यासाठीं खोल दडी मारी. कर्णधार नौका काबूंत

ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होता. सर्वजण भीतीनें गांगरून गेले होते. शक्तिदेवाला हा अनुभव नवाच होता. प्रत्यक्ष मृत्यूचें अक्राळविक्राळ स्वरूप त्याला जिवंतपणीं दिसूं लागलें. क्षणांतच एका प्रचंड लाटेच्या तडाखा बसून ती नौका समुद्रांतून डोकावणाऱ्या एका खडकावर आपटली व तिचे तुकडे तुकडे झाले. समुद्रदत्ताला सुदैवानें एका फळीचा आधार मिळाला. तीन दिवस तो समुद्राच्या पृष्ठावर तरंगत होता. चौथ्या दिवशीं तो कांहीं प्रवाश्यांच्या दृष्टीस पडला. त्यांनीं समुद्रदत्ताला आपल्या नावेवर घेतलें. समुद्रदत्ताचे प्राण सुदैवानें वांचले. पण शक्तिदेवाचा मात्र कोठेंच पत्ता लागला नाहीं.

● ● ●

### देवमाशाच्या पोटांत शक्तिदेव

नौका फुटली तेव्हां शक्तिदेव समुद्रांत फेकला गेला. त्याच वेळीं एक देवमासा त्या ठिकाणीं होता. त्यानें आपलें दरीसारखें प्रचंड तोंड उघडलें व शक्तिदेवाला वरच्यावर गिळून टाकलें. नंतर तो समुद्रांतून मजेंत संचार करूं लागला. दुसरे दिवशीं तो दैवयोगानें उत्स्थल द्वीपाजवळ आला. मासेमारीसाठीं समुद्रावर गेलेल्या सत्यव्रताच्या सेवकांना तो दिसला. मोठ्या शिताफीनें त्यांनीं त्याची शिकार केली आणि तें प्रचंड धूड त्यांनीं आपल्या मालकाकडे आणून दिलें. ती मोठी शिकार पाहून सत्यव्रताला खूप आनंद झाला. त्यानें आपल्या सेवकांकडून त्या माशाचे प्रथम चार भाग करविले. नंतर त्याच्या पोटाचा भाग चिरला. तेव्हां शक्तिदेव त्यांतून अलगद बाहेर आला. त्याचा जीव गुदमरला होता. बेशुद्ध झाल्यामुळें तो हालचाल करूं शकत नव्हता. माशाच्या पोटांतून मनुष्य बाहेर पडलेला पाहून सर्वांना आश्चर्य वाटलें. सत्यव्रतानें जवळ येऊन पाहिलें तों शक्तिदेवाच्या शरिरांत अजून प्राण घोटाळत होते. त्यानें शक्तिदेवाला शुद्धीवर आणण्याचे प्रयत्न केले. थोड्याच

वेळांत शक्तिदेवानें डोळे किलकिले करून सर्वांकडे पाहिलें. आपण कोठें आहोंत हेंच त्याला कळेना. उठण्याचीहि शक्ति त्याला उरली नव्हती.

● ● ●

## सत्यव्रताशीं मैत्री

सत्यव्रतानें त्याला आपल्या घरीं आणलें. स्वच्छ पाण्यानें त्याला स्नान घातलें. त्याचें अंग शेकलें. ऊबदार कपडे त्याला घातले. नंतर त्याला थोडें दूध व कांहीं फळांचा रस दिला. त्यामुळें शक्तिदेवाला बरीच हुषारी वाटूं लागली. तो ताजातवाना झाला आहे ह पाहून सत्यव्रतानें त्याची चौकशी केली. शक्तिदेवानेंहि अथपासून इतिपर्यंत सर्व हकीगत थोडक्यांत सांगितली. तेव्हां सत्यव्रत त्याला म्हणाला, " मित्रा ! तुझी चिकाटी खरोखरीच अपूर्व आहे. तुझें दैवहि बलवत्तर आहे. तूं ज्या द्वीपाला येण्यासाठीं निघाला होतास तेंच हें उत्स्थल द्वीप व मीच तो सत्यव्रत. मी बहुतेक सर्व द्वीपांवर जाऊन आलों आहें. पण तूं म्हणतोस ती नगरी मी अजून कोठेंहि पाहिली नाहीं." सत्यव्रताचे हे शब्द ऐकून शक्तिदेवानें आपल्या कपाळावर हात मारून घेतला. दुर्दैवाला टक्कर देण्याची आतां त्याला शक्ति उरली नव्हती. तो अगदीं निराश झाला. माशानें आपल्याला गिळून टाकलें असतें तर बरें झालें असतें असें त्याला वाटलें. त्याची ही अवस्था पाहून सत्यव्रताला त्याची कींव आली. धीर देत तो शक्तिदेवाला म्हणाला, " मित्रा ! तूं असा दुःखी कष्टी होऊं नको. आजचा दिवस तूं येथें विश्रांति घे. उद्यां सकाळपर्यंत कनकपुरी-संबंधीं कांहीं तरी मार्ग काढूं." असें म्हणून त्यानें शक्तिदेवाच्या जेवणा-खाण्याची व रहाण्याची व्यवस्था एका ब्राह्मणाच्या मठांत केली.

● ● ●

## मामेभावाची भेट

त्या मठांत विष्णुदत्त नांवाचा एक ब्राह्मण रहात होता.

शक्तिदेवानें त्याच्याबरोबर जेवण केलें. गप्पा-गोष्टी करीत असतां शक्तिदेवानें आपलें नांव, गांव, मूळचा प्रदेश विष्णुदत्ताला सांगितला. तें ऐकून विष्णुदत्तानें त्याला आनंदानें मिठीच मारली. शक्तिदेवाला त्याच्या या वागण्याचा मुळींच अर्थ लागेना. त्यानें विष्णुदत्ताकडे प्रश्नार्थक मुद्रेनें पाहिलें. त्यावेळीं विष्णुदत्ताच्या नेत्रांतून आनंदाश्रु ठिपकत होते. त्याचा कंठ गहिंवरून आला होता. सद्गदित स्वरांत तो म्हणाला, " शक्तिदेवा ! तूं माझा मामेभाऊ आहेस. किती दिवसांनीं मला माझ्या नातलगाची भेट होत आहे ! लहानपणींच मी आपला देश सोडून इकडे आलों व येथेंच कायमचा मुक्काम केला. तूंहि जर कांहीं काळ येथें राहिलास तर परदेशांतून येणाऱ्या प्रवाश्यांकडून तुला कनकपुरीचा पत्ता नक्की मिळेल." असें म्हणून अत्यंत प्रेमानें त्यानें शक्तिदेवाची व्यवस्था ठेवली. लांबच्या द्वीपावर आपला मामेभाऊ आपल्याला भेटला या गोष्टीमुळें शक्तिदेवालाहि खूप आनंद झाला. त्याचा आत्तांपर्यंतच्या प्रवासाचा शीण नष्ट झाला व रात्रीं गप्पा-गोष्टी करीत ते दोघे सुखानें झोंपीं गेले.

• • •

## कनकपुरीचा शोध

सत्यव्रतानें शक्तिदेवाला आश्वासन दिलें खरें पण त्याला कनकपुरीची माहिती कशी मिळवावी हेंच समजेना. त्यामुळें त्याला रात्रभर झोंप आली नाहीं. शेवटीं पहांटेच्या सुमारास त्याचा डोळयाला डोळा लागला. तो सकाळीं जागा झाला, तोंच त्याला एक उपाय सुचला. तो तसाच शक्तिदेवाकडे आला व म्हणाला, " मित्रा ! समुद्राच्या मध्यावर रत्नकूट नांवाचें एक द्वीप आहे. तें विष्णूचें निवासस्थान आहे. आषाढ शुद्ध एकादशीला तेथें मोठी यात्रा भरते. त्या यात्रेला सर्व द्वीपांवरून लोक येतात. त्यांच्यापैकीं कोणाकडून तरी कनकपुरीचा पत्ता नक्की मिळेल. तेव्हां आपण आजच त्या यात्रेला जाण्यासाठीं निघूं या. कारण यात्रेला

आतां एक आठवडाहि शिल्लक राहिलेला नाहीं." शक्तिदेवानें त्याला अनुमति दिली. विष्णुदेवानें प्रेमानें दिलेली शिदोरी त्यानें बरोबर घेतली व एका छोट्या होडींतून ते प्रवासास निघाले. सत्यव्रत स्वतः ती होडी चालवीत होता. हवा अनुकूल असल्यामुळें त्यांना वाटेंत कसलाच त्रास झाला नाहीं. दोघांच्या गप्पा चालल्या होत्या. तो भाग सत्यव्रताच्या पूर्ण परिचयाचा होता. त्या प्रदेशाबद्दल अनेक अद्‌भुत गोष्टी तो शक्तिदेवाला सांगत होता. त्या ऐकत असतां आपण चमत्कारांनीं भरलेल्या प्रदेशांतून प्रवास करीत आहोंत असेंच शक्तिदेवाला वाटलें.

• • •

## समुद्रांतील वटवृक्ष व शक्तिदेवावरील प्राणसंकट

ते होडींतून चालले असतां त्याच्या उजव्या बाजूस, पंख असलेल्या पर्वतासारखें कांहीं तरी समुद्रांतून वर आलेलें त्यांना दिसलें. तें पाहून शक्तिदेवाला आश्चर्य वाटलें. त्यानें सत्यव्रताला विचारलें तेव्हां सत्यव्रत म्हणाला, " मित्रा ! पर्वतासारखें दिसणारें हें एक वडाचें भव्य झाड आहे. याच्या बुंध्याजवळ अनेक भोवरे आहेत. समुद्रांतील वडवाग्नीचें वास्तव्य येथें असतें. त्याच्या आसपास कोणीहि फिरकत नाहीं. कारण येथें एखादी होडी गेली कीं प्रवाहाच्या वेगानें ती त्या भोवऱ्याकडे खेचली जाते व मग त्यांतील लोकांना कायमचीच जलसमाधि घ्यावी लागते. " सत्यव्रत ही माहिती सांगत असतांनाच, त्याला नकळत त्याची होडी तेथील प्रवाहांत सांपडली व वटवृक्षाकडे खेचली जाऊं लागली. तें लक्षांत येतांच दोघांचीहि पांचावर धारण बसली. सत्यव्रतानें ती होडी वळविण्याची आटोकाट धडपड केली, पण व्यर्थ. वल्हीं मारून मारून त्याची छाती फुटायची वेळ आली. काय करावें हेंच त्याला समजेना. दुर्दैव त्याच्यामागें हात धुऊन लागलें होतें. शेवटीं तो शक्तिदेवाला म्हणाला, " मित्रा ! आतां आपण नक्की मृत्यूच्या दाढेंत शिरणार. माझ्या मृत्यूबद्दल मला मुळींच

वाईट वाटणार नाहीं. पण इतके कष्ट घेऊनहि शेवटीं तुझें कार्य अपुरेंच राहिलें याबद्दल मला फार वाईट वाटतें. आतां यांतून कांहीं मार्ग दिसत नाहीं." असें तो शक्तिदेवाला सांगत आहे इतक्यांत पाण्याच्या पृष्ठभागाला टेकलेली एक फांदी त्याला दिसली. तो लागलीच शक्तिदेवाला म्हणाला, "मित्रा! ही पहा. या वटवृक्षाची ही फांदी अगदीं पाण्याला टेकल्यासारखी दिसते. त्या बाजूला मी होडी वळवितों. उडी मारून तूं या फांदीचा आधार घे. तुझें नशीब शिकंदर असलें तर त्यांतूनहि तुझ्या सुटकेचा एखादा मार्ग मिळेल. हं. आली पहा फांदी जवळ. पकड." शक्तिदेवाला विचार करण्यास वेळच नव्हता. त्यानें उडी मारून फांदीचा आधार घेतला तोंच आवाज करीत सत्यव्रताची होडी भोवऱ्यांत गिरक्या घेऊं लागली व क्षणार्धांत ती वडवाग्नीच्या भक्ष्यस्थानीं पडली.

● ● ●

## प्रचंड गिधाडांच्या सहवासांतील रात्र

शक्तिदेवाचे प्राण वांचले खरे, पण त्याला फारच दुःख झालें. 'आपल्या दोन उपकारकर्त्यांच्या मृत्यूला आपण कारणीभूत झालों' याचें त्याला फार वाईट वाटलें. पुढें काय करावें हें न सुचल्यामुळें आपल्या नशिबाला बोल लावीत दिवसभर तो अन्नपाण्याशिवाय झाडावरच बसून राहिला. संध्याकाळीं मोठमोठ्या आकृति त्याला आकाशांत दिसूं लागल्या. त्या झाडाच्याच दिशेनें सगळीकडून येत होत्या. आणखी कोणतें नवें संकट येणार या विचारानें क्षणभरच तो गोंधळून गेला. पण लागलीच येणाऱ्या संकटाला तोंड देण्याची त्यानें आपल्या मनाची तयारी ठेवली. त्या आकृति जसजशा जवळ येऊं लागल्या तसतशा त्या स्पष्ट दिसूं लागल्या. प्रचंड शरिरांचीं तीं गिधाडें होतीं. एक गिधाड म्हणजे एक लहानशी टेकडीच. गिधाडें अगदीं जवळ आलीं तेव्हां आतां आपली कांहीं धडगत नाहीं अशी त्याची खात्री झाली. पण

जिवाची आशा कुणाला नसते ? त्यानें पानांआड आपलें शरीर लपविलें व हूं कीं चूं न करतां श्वास रोधून तो गुपचुप पडून राहिला.

• • •

## शक्तिदेवाचें साहस

तीं गिधाडें एकामागोमाग एक त्या झाडावर येऊन बसलीं. मनुष्य-वाणीनें त्यांच्या गप्पा सुरू झाल्या. त्या ऐकून तो तर आश्चर्यानें थक्कच झाला. त्यांच्या गप्पा रंगांत आल्या होत्या. शक्तिदेव कान देऊन त्या ऐकत होता. त्यांपैकीं एक म्हातारें गिधाड सांगत होतें, " मित्रांनों ! तुमच्याइतक्या दूरच्या भराऱ्या मी मारूं शकत नाहीं. त्यामुळें मी जवळच्याच कनकपुरीला गेलों. तेथील उद्यानांत मी आजचा दिवस घाल-विला व उद्यां सकाळींहि मी तिकडेच जाणार आहें. " गिधाडाच्या तोंडून कनकपुरीचें नांव ऐकतांच शक्तिदेवाला आपल्या जीविताचें सार्थक झाल्या-सारखें वाटलें. पण त्या नगरींत जायचें कसें या विचारानें तो पुनः अस्वस्थ झाला. गिधाडांना त्याची चाहूल लागली असती तर त्यांनीं त्याचा केव्हांच फन्ना उडविला असता. बसलेल्या जागेवरूनच त्यानें त्या म्हाताऱ्या गिधाडा-कडे पाहिलें. त्याचीं नखें नांगराच्या फाळासारखीं होतीं. त्याचे पाय म्हणजे मोठाल्या झाडांचे बुंधेच वाटत. शक्तिदेवाच्या मनांत एक विचार आला, ' हीं गिधाडें झोंपलीं कीं आपण या म्हाताऱ्या गिधाडाच्या कुशींत शिरावें. त्याला आपलें वजन मुळींच जाणवणार नाहीं. सकाळीं तें उडण्याच्या बेतांत असण्यापूर्वींच आपण त्याच्या पंखांतून मार्ग काढींत त्याच्या पाठीवर चढून बसावें व पहावी आपल्या नशिबाची शेवटची परीक्षा. एरवी येथून आपल्या सुटकेचा दुसरा कांहींच मार्ग नाहीं. जीव धोक्यांत घातला तरच यशाची आशा ! ' असा विचार करून तो योग्य संधीची वाट पाहूं लागला. बऱ्याच वेळानें सगळीकडे सामसूम झाली. दमून आलेलीं गिधाडें शांत झोंपीं गेलीं. शक्तिदेव हळूहळू त्या म्हाताऱ्या गिधाडाजवळ गेला. तें गाढ

झोपीं गेलें आहे हें पाहून तो त्याच्या कुशींत गडप झाला. गिधाडानें थोडी चुळबुळ केली. पण त्याला जाग मुळींच आली नाहीं. आपलें दैव बलवत्तर असें समजून तो त्याच्या पंखांचा आधार घेत घेत शेवटीं त्या गिधाडाच्या पाठीवर आला व तेथेंच कांहीं पिसांना तो बिलगून बसला. त्या अवधींत रात्र केव्हां निघून गेली हें त्याला समजलेंहि नाहीं.

● ● ●

## गिधाडाच्या पाठीवरून प्रवास

सूर्योदयाच्या सुमारास सर्व पक्षी विहार करण्यासाठीं वेगवेगळ्या दिशांना निघाले. तें म्हातारें गिधाडहि कनकपुरीच्या रोखानें चाललें. शक्तिदेव त्याच्या पाठीवर पिसांखालीं दडून बसला होता. आकाशांतून संचार करण्याचा शक्तिदेवाचा हा अनुभव कांहीं अपूर्वच होता. वरून पृथ्वी कशी दिसते हें पाहण्याचा त्याला अनावर मोह झाला. पण आपलें अस्तित्व गिधाडाच्या लक्षांत येईल या भीतीनें तो जागचा हालला नाहीं. थोड्याच वेळांत तें गिधाड एका उपवनांत उतरलें. त्यावेळीं त्याचा डोळा चुकवून शक्तिदेव हळूच निसटला व झाडाआड लपत छपत तो गिधाडाच्या दृष्टिआड झाला. थोड्याच वेळांत तें गिधाड दुसरीकडे निघून गेलें. तेव्हां तो निर्भयपणें त्या उपवनाची शोभा पहाण्यांत दंग होऊन गेला.

● ● ●

## कनकपुरींत आगमन

त्याच वेळीं दोन स्त्रिया फुलें वेंचीत वेंचीत त्या ठिकाणीं आल्या. त्या उद्यानांत एक मनुष्य हिंडत असलेला पाहून त्यांना मोठें आश्चर्य वाटलें. कारण त्या विद्याधरांच्या नगरींत अजूनपर्यंत मनुष्यानें पूर्वीं कधीं प्रवेश केला नव्हता. त्यालाहि आपण कोठें आलों आहोंत याची खात्री करून घ्यायची होती. म्हणून त्यानें त्या दोघींना विचारलें, “ अहो ! या नगरीचें नांव काय व आपण कोण आहांत ? ” त्याच्या या प्रश्नावरून

तो अगदींच नवखा आहे याची त्यांना खात्री पटली. त्या म्हणाल्या, " महाराज ! या नगरीचें नांव कनकपुरी. येथें सर्व विद्याधरच रहातात. या प्रदेशाचें राज्यदेखील चंद्रप्रभा नांवाच्या एका विद्याधरीकडेच आहे. ही बाग तिचीच आहे. आम्ही तिच्या दोन मैत्रिणी तिच्यासाठीं फुलें वेंचीत आहोंत. " तें ऐकून शक्तिदेवाला अत्यानंद झाला. ज्यासाठीं त्यानें आतांपर्यंत आपल्या जिवाचें रान केलें तो त्याचा हेतु साध्य झाला होता. आज त्याचें जीवितकार्य सफळ झालें होतें. तो त्या विद्याधरींना विनवणीच्या स्वरांत म्हणाला, " मला तुमच्या मैत्रिणीला भेटण्याची इच्छा आहे. तेव्हां कृपा करून तिला भेटण्याची व्यवस्था कराल काय ? " चंद्रप्रभेनेंहि अजूनपर्यंत मनुष्यप्राणी पाहिला नव्हता. तो दाखविण्याची पहिली संधि आपल्याला मिळणार या आनंदांत त्यांनीं त्याची विनंति मान्य केली. शक्तिदेवाला बरोबर घेऊन त्या नगरींत आल्या व गजबजलेल्या रस्त्यानें त्यांनीं त्याला राजवाड्यांत आणिलें. रस्त्यावरील विद्याधर त्याच्याकडे आश्चर्यचकित नजरेनें पहात होते.

● ● ●

## चंद्रप्रभेची भेट व रहस्यकथन

गजवाडा पाहून त्याच्या आश्चर्याला सीमाच राहिली नाहीं वाड्याच्या भिंती सोन्याच्या पत्र्यांनीं मढविलेल्या होत्या. वाड्यांतील खांब रत्नांनीं जडविलेले होते. वाड्यांत सगळीकडे मखमलीचे उंची गालिचे घातले होते. तें सर्व ऐश्वर्य पाहून त्याचे डोळे दिपून गेले. चंद्रप्रभेच्या मैत्रिणींनीं त्याला थेट तिच्या महालांत नेलें. चंद्रप्रभेनें त्याचें मोठ्या सन्मानानें स्वागत केलें. एका रत्नजडित मंचकावर तो बसल्यावर तिनें विचारलें, " महाराज ! आपण कोण व मनुष्यांना अगम्य अशा या विद्याधरांच्या प्रदेशांत आपण प्रवेश कसा केला ? " शक्तिदेवानें आपली सर्व हकीगत तिला थोडक्यांत सांगितली. शक्तिदेव ती सांगत असतां,

चंद्रप्रभेच्या चेहऱ्यावर सारखे आश्चर्याचे भाव उमटत होते. त्याचबरोबर तिच्या मनांत माजलेला विचारांचा गोंधळहि तिच्या चेहऱ्यावर स्पष्ट उमटला. शेवटीं तिनें मनाशीं कसला तरी निश्चय केला व एक दीर्घ उसासा टाकून ती म्हणाली, "महाराज ! ज्या कनकरेखेच्या सांगण्यावरून कनकपुरीचा शोध करीत आपण येथें आलांत, ती कनकरेखा माझी सख्खी बहीण आहे. एका मुनीच्या शापामुळें ती मनुष्य-जन्माला आली आहे. पण आतां ती शापमुक्त होण्याची वेळ आलेली दिसते."

● ● ●

## विद्याधरकन्यांचा इतिहास

चंद्रप्रभेचे हें बोलणें ऐकून शक्तिदेव अधिकच बुचकळ्यांत पडला. त्यानें चंद्रप्रभेला आपली सर्व हकीगत सांगण्याचा आग्रह धरला. त्याचें मन तिला मोडवेना. तेव्हां चंद्रप्रभेनें सांगण्यास सुरुवात केली. ती म्हणाली, "महाराज ! या प्रदेशावर आमच्या वडिलांचें राज्य होतें. त्यांचें नांव आहे शशिखंड. त्यांना आम्हीं चौघी मुली. चौघींत मीच वयानें मोठी आहें. माझें नांव चंद्रप्रभा. एकदा माझ्या तिघी बहिणी मंदाकिनींत स्नान करण्यासाठीं गेल्या. त्याच वेळीं उग्रतप नांवाचा एक मुनि मंदाकिनीच्या प्रवाहांत स्नान करीत होता. माझ्या बहिणींना त्याची चेष्टा करण्याची लहर आली. त्यांनीं त्याच्यावर पाण्याचा खूप मारा केला व त्याला अगदीं सतावून सोडलें. त्याला राग आला व "पापिणींनों ! तुम्ही एका निरपराध मुनीचा छळ मांडला आहे. तेव्हां तुम्हां सर्वांना मृत्युलोकांत जन्म घ्यावा लागेल" असा शाप त्यानें दिला. आमच्या वडिलांना जेव्हां ही गोष्ट समजली, तेव्हां त्यांनीं जाऊन त्या मुनीचे पाय धरले व आपल्या अल्लड मुलींना क्षमा करण्याची विनंति केली. पण त्याचा विशेष उपयोग झाला नाहीं. तो मुनि वडिलांना म्हणाला, "माझा शाप कधींहि खोटा ठरणार नाहीं. मृत्युलोकांतहि त्यांना पूर्वजन्मींचें स्मरण राहील अशी व्यवस्था मी तुझ्या विनंतीमुळें

करतों." एवढें बोलून त्यांच्या शापमुक्ततेचीं कारणेंहि त्यानें आमच्या वडिलांना सांगितलीं व तो निघून गेला. त्याच्या शापामुळें माझ्या तिघी बहिणींना आपल्या शरिराचा त्याग करून मृत्युलोकांत जन्म घ्यावा लागला. त्यांच्या विरहानें वडिलांना राजवाड्यांत रहाणें दुःसह होऊं लागलें. त्यांनीं राज्याची सर्व जबाबदारी माझ्यावर सोंपविली व संसाराला कंटाळून वनवास स्वीकारला." इतकें बोलून तिनें एक दीर्घ उसासा सोडला व ती पुनः सांगूं लागली, "वडिलांच्या सांगण्यावरून मी या देशाचा कारभार पाहूं लागलें. पण माझें मन कशांतच रमेना. वडिलांची व बहिणींची परिस्थिति नेहमीं मनांत येई व आपलें पुढें काय होणार या विचारानें मन नेहमीं अस्वस्थ असे. अशा स्थितींत देवी पार्वती एकदा माझ्या स्वप्नांत आली व म्हणाली, "बाळे ! तूं कसलीहि चिंता करूं नकोस. एक प्रयत्नशील धाडसी मानव तुझा पति होईल." देवीच्या शब्दांवर विश्वास असल्यामुळें इतर विद्याधर मला सांगून आले असतांनाहि मी अविवाहितच राहिलें. आज आपण येथें आलांत; तेव्हां आपण माझा पत्नी म्हणून स्वीकार करावा."

• • •

## चंद्रप्रभेच्या विनंतीस मान्यता

आपण स्वप्नांत तर नाहींना असा शक्तिदेवाला भ्रम झाला. पण ती वस्तुस्थिति आहे अशी खात्री झाल्यावर त्याला अत्यानंद झाला. अग्नीच्या खाईतून बाहेर पडून आपण अमृताच्या डोहांत डुंबत आहोंत असें त्याला वाटलें. चंद्रप्रभेच्या विनंतीला त्यानें आनंदानें मान्यता दिली. तेव्हां ती पुनः म्हणाली, "महाराज ! मी मनानें आपल्याला केव्हांच वरलें आहे. पण आपल्या प्रत्यक्ष विवाहाला मला माझ्या वडिलांची अनुमति मिळविली पाहिजे. येत्या चतुर्दशीला जवळच्या 'ऋषभ' पर्वतावर श्रीशंकराची यात्रा आहे. या यात्रेसाठीं सर्व विद्याधर एकत्र येतात. माझे

वडीलहि त्या वेळीं तेथें येतील. त्यांच्या भेटीसाठीं मीहि तिकडे जाईन व आपल्या विवाहाला त्यांची संमति मिळवीन. ते माझ्या इच्छेविरुद्ध मुळींच जाणार नाहींत. तोंपर्यंत आपण येथेंच रहावें. कसलाहि संकोच वाळगूं नये." असें म्हणून तिनें त्याला रहाण्यासाठीं एक स्वतंत्र महाल दिला. शक्तिदेवहि तिच्या प्रेमपूर्ण आदरातिथ्याचें स्वागत करीत कांहीं काळ तेथेंच राहिला.

चंद्रप्रभा त्याच्याशीं अत्यंत मोकळेपणानें वागे. तिनें त्याची चांगली बडदास्त ठेवली होती. पण ती कांहीं तरी गोष्ट आपल्यापासून लपवीत आहे अशी शंका मध्येंच शक्तिदेवाला येत असे. तिला तसें स्पष्ट विचारण्याचें धैर्य मात्र त्याला नव्हतें; त्यामुळें त्याचा अगदीं नाइलाज होई.

● ● ●

## चंद्रप्रभेचें ऋषभ पर्वतावर गमन

चतुर्दशीचा दिवस उजाडला. चंद्रप्रभा सकाळीं लवकरच शक्तिदेवाकडे आली व म्हणाली, " महाराज ! आम्ही सर्व विद्याधर शंकराच्या यात्रेला जात आहोंत. मला परत यायला दोन दिवस लागतील. तोंपर्यंत आपल्याला एकट्यालाच येथें रहावें लागणार आहे. येथें कंटाळा आला तर आपण जवळपासच्या कोणत्याहि उद्यानांत फिरायला जा. पण आमच्या वाड्याच्या मधल्या मजल्यावर मात्र मुळींच जाऊं नका. मी लगेच आपल्या सेवेला परत येतें. मीं सांगितलेली गोष्ट मात्र लक्षांत ठेवा हं." असें वारंवार बजावून चंद्रप्रभा ऋषभ पर्वतावर निघून गेली.

● ● ●

## शक्तिदेवाला गूढ रहस्याचा साक्षात्कार

एका दिवसांतच शक्तिदेवाला एकटें रहाण्याचा कंटाळा आला. अनेक नवीन स्थळांना भेटी देऊन तो आपल्या मनाची करमणूक करण्याचा प्रयत्न करीत होता. पण त्याचें मन कोठेंच रमेना. चंद्रप्रभेनें

आपल्याला मधल्या मजल्यावर जाण्यास बंदी कां केली असावी हा एकच विचार त्याच्या मनांत सारखा येऊं लागला. आपलें मन आवरण्याचा त्यानें खूप प्रयत्न केला. पण त्याच्या बंडखोर मनानें त्याला मुळींच दाद दिली नाहीं. शेवटीं मधल्या मजल्यावर आहे तरी काय हें जाणण्याच्या इच्छेनें तो तेथें आला. तेथील दार नुसतेंच लोटून घेतलेलें त्याला दिसलें. दार उघडून तो धडधडत्या अंतःकरणानें आंत आला. पाहतो तों त्याला तेथें तीन रत्नजडित मंडप दिसले. एकाचें दार उघडेंच होतें. तो आंत गेला. त्याला आश्चर्याचा धक्काच बसला. आंतील पलंगावर कोणीतरी व्यक्ति तोंडावरून पांघरूण लपेटून झोंपली असल्याचा त्याला भास झाला. ती व्यक्ति कोण असेल याची त्याला कांहींच कल्पना येईना. त्याला थोडी भीतिहि वाटली. नकळत त्याचा हात कमरेवरील कट्यारीकडे वळला. थोडा वेळ तो विचारांत पडला. शेवटीं पलंगावर कोण झोंपलें आहे हें पहाण्याचें त्यानें ठरविलें. त्यानें त्या व्यक्तीच्या चेहऱ्यावरील पांघरूण हलकेंच दूर केलें आणि आश्चर्यानें तो जागच्या जागींच खिळून राहिला. ती व्यक्ति दुसरी-तिसरी कोणी नसून त्याला अर्धचंद्र देऊन महालांतून हांकलून लावणारी कनकरेखाच होती. स्वतःच्या डोळ्यांवरहि त्याचा विश्वास बसेना. स्वतःला चिमटा काढून आपण स्वप्नांत नाहीं याची त्यानें खात्री करून घेतली. तो स्वतःशींच म्हणाला, " काय हें गौडबंगाल आहे कोण जाणें ! जिच्यासाठीं मीं पृथ्वी पालथी घातली, ती कनकरेखा येथें कशी ? " त्यानें तिच्याकडे निरखून पाहिलें. तोंच तिचा श्वासोच्छ्वासहि बंद असल्याचें त्याच्या लक्षांत आलें. ती मेलेली आहे म्हणावें तर तिच्या चेहऱ्यावरील टवटवी मुळींच कमी झालेली नव्हती. कांहीं केल्या त्याला हें कोडें सुटेना. तशाच संदिग्ध अवस्थेंत तो पुढील दोन्ही मंडपांत आला. तेथेंहि प्रत्येक मंडपांत एक एक

रत्नजडित पलंग होता व प्रत्येकावर एक सुंदर कन्या अशाच रीतीनें अचेतन होऊन पडलेली त्याला दिसली.

● ● ●

## दिव्य घोड्याचा विचित्र अनुभव

या सर्व गोष्टींबद्दल आश्चर्य करीत तो त्या महालांतून बाहेर पडला व जिना उतरून वाड्याच्या मागील बाजूस एका बागेंत आला. ती बागहि तो आज प्रथमच पहात होता. त्या बागेंतील चित्रविचित्र वेली व आश्चर्यकारक वृक्ष पहात पहात तो एका सुंदर विहिरीच्या कांठीं आला. त्या ठिकाणीं एक पांढरा शुभ्र धिप्पाड घोडा बांधलेला होता. घोड्याच्या पाठीवर रत्नजडित खोगीरहि घातलेलें होतें. ओठ फुरफुरत तो जणूं शक्तिदेवाला बोलावीतच होता. तो उमदा घोडा पाहून त्याच्यावरून एक फेरफटका मारून यावें असें शक्तिदेवाला वाटलें. तो त्या घोड्याजवळ आला. त्याची पाठ थोपटून त्यानें घोड्यावर टांग मारली. तोंच घोडा उधळला व बेसावध शक्तिदेव खालीं कोसळला तो थेट विहिरीमध्येंच पडला. त्याच्या नाकातोंडांत पाणी गेलें. तो कसाबसा पाण्याच्या पृष्ठभागावर आला व पहातो तों, वर्धमान नगरीमधील एका उद्यानांतील विहिरींत आपण आहोंत, असें त्याला दिसून आलें. त्याला कांहींच कळेना. वर येऊन त्यानें खात्री करून घेतली व 'कनकपुरींतील वैभवाला आपण कायमचे पारखे झालों' असें म्हणत मोठ्या जड अंतःकरणानें तो घराकडे निघाला.

● ● ●

## वर्धमान नगरींत पुनरागमन

तो रस्त्यानें चालला असतां राजाची कनकपुरीसंबंधींची पूर्वींचीच घोषणा चाललेली त्याला ऐकूं आली. त्यानें आपला विचार बदलला व तो थेट राजवाड्यांत आला. निरोप पाठवून त्यानें राजाची भेट घेतली व "महाराज ! मी कनकपुरीहून नुकताच आला आहें, हें सांगण्यासाठीं

वरींहि न जातां मी प्रथम आपणाकडे आलों आहें." असें तो राजाला म्हणाला. पूर्वींचाच हा थापाड्या पुनः आलेला आहे, हें पाहून राजाला त्याचें म्हणणें खरें वाटेना. तेव्हां शक्तिदेव त्याला म्हणाला, "महाराज! आतां जर माझें म्हणणें खोटें ठरलें तर आपण मला देहान्ताची शिक्षा द्या." तें ऐकून त्याचा खरेपणा पडताळण्यासाठीं राजानें कनकरेखेला बोलावून घेतलें.

● ● ●

## कनकप्रभेची प्राप्ति व वियोग

शक्तिदेवाला राजाच्या महालांत पाहून कपाळाला आंठ्या घालीत तिनें विचारलें, "बाबा! या भामट्याला आपण येऊं कसें दिलें? मी याचें तोंडहि पहायला तयार नाहीं. हा निघून गेल्यानंतर मी आपल्या भेटीस येईन." असें म्हणून ती निघालीसुद्धां. तेव्हां शक्तिदेव तिला उद्देशून म्हणाला, "माझें तोंड पहायचें कीं नाहीं हें तुझें तूं ठरव. पण कनकपुरींत रत्नजडित मंचकावर गतप्राण होऊन पडलेली तूं येथें अजून जिवंत कशी हें मला सांग." हें ऐकून ती जागच्या जागींच थबकली. मागें वळून तिनें शक्तिदेवाकडे एकदा निरखून पाहिलें. त्याच्या डोळ्यांत विजयाचें तेज चमकत होतें. त्यानें कनकपुरी पाहिली असल्याची तिची खात्री पटली. आपल्या बोलण्याची तिला लाज वाटली. वडिलांच्याजवळ येऊन ती म्हणाली, "बाबा, पूर्वीच्या प्रसंगामुळें मी यांना हवी तशी टाकून बोललें. पण माझ्या हातून फार मोठी चूक झाली. मी एक शापभ्रष्ट विद्याधरी आहें. एखाद्या मानवानें कनकपुरींतील माझा जतन करून ठेवलेला मृत देह पाहून माझें खरें स्वरूप उघड केल्यावर मी शापांतून मुक्त होणार होतें. तो क्षण आतां आला आहे. मी आतां पूर्वशरिरांत प्रवेश करतें. लवकरच या महात्म्याशीं कनकपुरींत माझा विवाह होईल. आजपर्यंतच्या आपल्या प्रेमळ वागणुकीबद्दल मी आपली जन्माची ऋणी

आहें. जातें मी. " असें म्हणून तिनें राजाच्या पायांवर डोकें ठेवलें व ती तेथेंच मरून पडली.

कनकप्रभा एकाएकीं गतप्राण झालेली पाहून राजा मूर्च्छित होऊन पडला. राजवाड्यांत क्षणांत हलकल्लोळ माजला. प्रत्येकजण शक्तिदेवालाच बोल लावीत होता. पण त्याचा खरोखरी त्यांत काय दोष ? उलट कनकरेखा आपल्याला मिळणार, या आनंदांत तो होता. पण त्याच्या दुर्दैवानें चंद्रप्रभा व कनकप्रभा या दोन्ही विद्याधरींना तो आतां पारखा झाला होता. आपल्या फुटक्या नशिबाला दोष देत तो मोठ्या कष्टानें राजवाड्यांतून बाहेर पडला. कनकप्रभेच्या बोलण्यांत त्याला आशेचे अंकुर दिसले. पूर्वींच्याच मार्गानें कनकपुरीला जाऊन दोन्ही विद्याधरींना भेटण्याचा त्यानें निश्चय केला व नव्या दमानें तो प्रवासास निघाला.

• • •

**पुनश्च हरिः ॐ**

अनेक संकटांना तोंड देत तो विटंकपुरांत आला. आपल्यासाठीं समुद्रदत्त प्राणाला मुकला या विचारानें त्याचें मन भारावून गेलें. पण रस्त्यानें तो चालला असतां समुद्रदत्ताला पाहून त्याचा स्वतःच्याहि डोळ्यांवर विश्वास बसेना. शक्तिदेव बुडाला असावा अशी समुद्रदत्ताची कल्पना झाली होती. त्यामुळें समुद्रदत्तानें प्राणसंकटांतून तो वांचून आल्याबद्दल त्याचें अभिनंदन केलें व मोठें आदरातिथ्य करून शक्तिदेवाला त्यानें त्या रात्रीं आपल्या घरीं ठेवून घेतलें. दुसरे दिवशीं उत्स्थलद्वीपाकडे जाणाऱ्या व्यापाऱ्यांना बोलावून शक्तिदेवालाहि त्यांच्याबरोबर नेण्याची त्यानें व्यवस्था केली.

• • •

**शक्तिदेवावर आलेलें नवें प्राणसंकट**

तो उत्स्थलद्वीपावर आला असतां समुद्रगुप्ताप्रमाणें सत्यव्रतहि

प्राणसंकटांतून निभावून परत आला असेल काय, असा विचार करीत तो पेठेंतून चालला. इतक्यांत सत्यव्रताच्या मुलांनीं त्याला हटकलें. त्याच्याकडे सत्यव्रताची चौकशी करण्यापूर्वीच त्यांनीं शक्तिदेवाला विचारलें, " अहो ! तुम्ही एकटेच कसे परत आलां ? आमचे बाबा कुठें आहेत ? " मित्राच्या आठवणीनें त्याचा कंठ दाटून आला. तो सद्गदित स्वरांत त्यांना म्हणाला, " समुद्रांत नाव एका भोंवऱ्यांत सांपडली व तुमच्या वडिलांना वडवानलाच्या भक्ष्यस्थानीं पडावें लागलें. " त्यांच्यापैकीं कुणाचाहि त्याच्या सांगण्यावर विश्वास बसेना. " याच दुष्टानें आपल्या बाबांना मारलें असलें पाहिजे. नाहीं तर दोघांपैकीं तेच तेवढे वडवानलांत पडतात व हा चोर सुखरूप रहातो हें कसें शक्य आहे ? " असे म्हणत त्यांनीं त्याच्या मुसक्या बांधल्या. त्याच्या कृत्याबद्दल दुसरे दिवशीं त्याला चंडिकेपुढें बळी द्यायचें असें त्यांनीं ठरविलें व रात्रभर त्याला त्यांनीं अंधार-कोठडींत डांबून टाकलें.

• • •

## देवीचा दृष्टान्त

तें अकल्पितपणें आलेलें संकट पाहून शक्तिदेव गोंधळून गेला. रात्रभर त्याला झोंप नव्हती. त्यानें देवीची प्रार्थना केली. पहांटेच्या वेळीं त्याला थोडीशी झोंप लागली. तेव्हां देवी स्वप्नांत येऊन त्याला म्हणाली, " बाळा, घाबरूं नकोस. या कोळ्यांची बिंदुमति नांवाची बहीण सकाळीं तुला भेटेल व तुला पाहून आपल्याशीं विवाह करण्याची ती विनंति करील. तूं तिला होय म्हण. ती कोळ्याच्या जातीची आहे, म्हणून तूं तिला झिडकारूं नकोस. ती शापानें भ्रष्ट झालेली एक विद्याधरी आहे. ती तुला या संकटांतून तारून नेईल. " असें म्हणून देवी अदृश्य झाली. थोड्या वेळानें शक्तिदेव जागा झाला. स्वप्नामुळें त्याला बराच धीर आला होता.

• • •

## बिंदुमतीची भेट

सकाळीं बिंदुमतीनें शक्तिदेवाची भेट घेतली. त्याला पाहून तिचे पूर्वजन्मींचे संस्कार जागृत झाले. तिनें त्याला मनानें वरलें. त्याला अभिवादन करून ती म्हणाली, " महाराज ! पत्नी म्हणून आपण माझा स्वीकार करणार असाल तर आपली या प्राणसंकटांतून मुक्तता होईल. " शक्तिदेवाला स्वप्नांतील देवींचे शब्द आठवले. त्यानें तिला संमति दिली. तिनें आपल्या भावांची समजूत घातली. ते तिच्या शब्दाबाहेर कधींच जात नसत. तिच्या सांगण्यावरून त्यांनीं शक्तिदेवाची सुटका केली. योग्य विधीनें तिच्याशीं विवाह करून त्यांच्याच वाड्यांत तो सुखानें राहूं लागला.

● ● ●

## बिंदुमतीचा इतिहास

एकदा तो वाड्याच्या गच्चीवर उभा होता. बिंदुमति त्याच्या शेजारींच होती. समोरून एक चांडाळ एका मेलेल्या गाईला फरफटत नेत असतांना त्याला दिसला. तेव्हां तो बिंदुमतीला म्हणाला, " प्रिये ! त्रैलोक्याला वंद्य असलेल्या धेनूचें मांस हे चांडाळ खातात व विकतात. कुठें पाप फेडणार हे लोक ? " तेव्हां बिंदुमति म्हणाली, " महाराज ! गाईचा प्रभाव अचिंत्य आहे. गाईचा क्षुल्लक अपराध केल्यामुळेंच मलादेखील मृत्युलोकावर चांडाळयोनींत जन्म घ्यावा लागला. " शक्तिदेवाला तिच्या जन्माचें रहस्य समजून घ्यायचेंच होतें. त्यानें त्याबद्दल विचारलें असतां ती म्हणाली, " माझी एक विनंति मान्य करण्याचं आपण वचन देत असाल तर मी आपणाला माझ्या पूर्वजन्मींची गोष्ट सांगेन." तिचें म्हणणें काय तें काढून घेण्याचा शक्तिदेवानें खूप प्रयत्न केला; पण बिंदुमतीनें त्याला मुळींच दाद दिली नाहीं. शेवटीं त्यानें तिला वचन दिलें. तेव्हां ती म्हणाली, " महाराज ! लवकरच दुसरी एक स्त्री आपली पत्नी होईल. तिच्या पोटीं एक बालक जन्माला येणार

आहे. पण त्याच्या जन्मापूर्वींच तिचें पोट फाडून आपण त्या बालकाची मान पकडली पाहिजे." तिचे ते अघोरी शब्द ऐकून त्याचें अंग भीतीनें शहारून गेलें. पण तो तिला प्रथमच वचन देऊन चुकला होता. "ठीक आहे," असें म्हणून त्यानें तिला तिच्या जन्माची हकीगत विचारली. तेव्हां ती म्हणाली, "महाराज! गेल्या जन्मीं मी एक विद्याधरी होतें. त्या वेळीं गाईच्या स्नायूंपासून तयार केलेले, एका वीणेचे तंतु मीं सहज दांतांनीं तोडले. पण नकळत त्यांचा माझ्या दांतांना स्पर्श झाल्यानें मला हा कोळ्याचा जन्म आला आहे. मग जे लोक प्रत्यक्ष गाईचें मांस खात असतील त्यांचें काय होत असेल देव जाणे!"

• • •

## रानडुकराची शिकार

असें बोलत तीं दोघें गच्चीवर उभीं आहेत तोंच बिंदुमतीचा एक भाऊ घाईघाईनें तेथें आला व शक्तिदेवाला म्हणाला, "महाराज! एक मोठा रानडुक्कर या भागांत धुमाकूळ घालीत आहे. त्यानें अनेकांचा फडशा पाडला आहे. तरी आपण त्याचें पारिपत्य करावें." हें ऐकून शक्तिदेव लागलीच उठला. त्यानें बिंदुमतीचा निरोप घेतला व शिकारीच्या तयारीनें घोड्यावर मांड ठोकून तो शेजारच्या अरण्याकडे निघाला. माणसाची चाहूल लागतांच तो माजलेला डुक्कर चवताळून शक्तिदेवावर चालून आला. शक्तिदेवानें त्याला आपल्या अंगावर घेऊन हातांतील शस्त्रानें त्याच्यावर जोरानें प्रहार केला. तेव्हां तो वराह जखमी स्थितींतच जीव घेऊन पळूं लागला. शक्तिदेवानेंहि त्याचा पाठलाग चालूंच ठेवला. शेवटीं तो वराह एका गुहेंत शिरला. शक्तिदेवहि न डगमगतां त्याच्या मागोमाग गुहेंत गेला. तेथें तो डुक्कर अदृश्य झाल्याचें त्याला आढळून आलें व एक अपूर्व दृश्य त्याच्या दृष्टीस पडलें.

• • •

**बिंदुरेखेची प्राप्ति**

त्या गुहेंत एक सुंदर बाग होती. त्या बागेच्या मध्यभागीं असलेल्या एका भव्य वाड्यांतून एक सुंदर कन्या घाईघाईनें बाहेर येत होती. ती वनदेवता तर नसेल ! असा विचार शक्तिदेवाच्या मनांत आला. त्याच वेळीं ती कन्या गोंधळलेल्या स्थितींत बागेंतील रस्त्यानें त्याच्या दिशेनेंच आली. अत्यंत विस्मयानें शक्तिदेवानें तिला विचारलें, " सुंदरी ! तूं कोण आहेस व अशी गोंधळलेली कां दिसतेस ? " त्याचा तो प्रश्न ऐकून ती क्षणभर थांबली. शक्तिदेवाची तेजस्वी व धीरगंभीर आकृति पाहून तिला धीर आला व ती म्हणाली, " महाराज ! दक्षिणेकडील चंडविक्रम राजाची मी एकुलती एक कन्या आहें. माझें नांव बिंदुरेखा. मी उद्यानांत विहार करीत असतां एका दुष्ट दैत्यानें मला पळवून येथें आणून ठेविलें. भक्ष्य शोधण्यासाठीं आज सकाळीं तो वराहाचें रूप घेऊन बाहेर पडला. पण कोणा तरी वीरानें त्याला घायाळ केलेलें दिसतें. तो जखमी अवस्थेंतच येथें आला व लागलीच मरून पडला. तें पाहून स्वतःची सुटका करून घेण्यासाठीं मी येथून निघालें आहें. " तिचें हें बोलणें ऐकून शक्तिदेव धीर देत तिला म्हणाला, " अशी भिऊं नकोस. मीच त्या वराहाला घायाळ केलें होतें. तो मेला असल्यास, तुला आतां कशाचेंहि भय नाहीं. " तें ऐकून बिंदुरेखेनें कृतज्ञतापूर्वक शक्तिदेवाची चौकशी केली व त्यानें थोडक्यांत आपली हकीगत सांगितल्यावर ती त्याला म्हणाली, " माझ्या प्राणांचें रक्षण करणारे आपणच माझे प्राणनाथ आहांत. पत्नी म्हणून आपण माझा स्वीकार करावा हीच आपणांजवळ भीक मागतें. " तिच्या विनंतीचा स्वीकार करून तिला घेऊन तो घरीं आला. बिंदुमतीच्या संमतीनें एका शुभमुहूर्तावर त्यानें तिच्याशीं विवाह केला.

नों. दि. ...

## शक्तिदेवाच्या कसोटीची वेळ व दिव्य अस्त्राची प्राप्ति

बिंदुमति व बिंदुरेखा या दोन्ही पत्न्यांच्या सहवासांत शक्तिदेवाचा काळ सुखांत चालला होता. पुढें कांहीं दिवसांनीं बिंदुरेखा गरोदर झाली. तिच्या प्रसूतीची वेळ जवळ आली असतां बिंदुमति शक्तिदेवाकडे आली व म्हणाली, " महाराज ! मला दिलेल्या वचनाची आठवण आहे ना ? पूर्वी कबूल केल्याप्रमाणें बिंदुरेखेचें पोट फाडून तिच्या बालकाची मान पकडा व त्याला बाहेर काढा ! " बिंदुमतीचे हे शब्द ऐकून शक्तिदेवाच्या अंगावर भीतीनें शहारेच उभे राहिले. तो बिंदुमतीला वचन देऊन चुकला होता. काय करावें हें त्याला सुचेना. तो जड पावलांनीं बिंदुरेखेच्या महालांत आला. त्याचा चेहरा उतरला होता. मान वर करून बोलण्याची त्याची हिंमत नव्हती. त्याची ती अगतिक अवस्था पाहून बिंदुरेखाच त्याला शांत स्वरांत म्हणाली, " महाराज ! आपण असे कष्टी कां ? बिंदुमतीला वचन दिल्याप्रमाणें आपण वागलेंच पाहिजे. माझ्या जिवाची आपण पर्वा करूं नये व या बाबतींत आपण कसलाहि संकोच बाळगूं नये. " असें म्हणून अनेक गोष्टींनीं तिनें त्याचें मन वळविलें. तरीहि ती गोष्ट करायला त्याचें मन धजेना. तेव्हां आकाशवाणी झाली, " शक्तिदेवा ! मनांत कसलीहि शंका न धरतां तूं बिंदुरेखेचें पोट फाडून, तिचा मुलगा बाहेर काढ. त्यामुळें तुला दिव्य सामर्थ्य प्राप्त होईल. " ही आकाशवाणी ऐकून मन दगडासारखें घट्ट करून त्यानें बिंदुरेखेचें पोट फाडलें व बालकाची मान पकडली. तों काय आश्चर्य ! त्याच्या हातीं तेजानें तळपणारें एक दिव्य शस्त्र चमकूं लागलें व त्याच्या प्रभावामुळें तो त्याच क्षणीं विद्याधर बनला. बिंदुरेखा मात्र गतप्राण होऊन पडली.

• • •

## बिंदुमतीची विनंति

बिंदुमतीला ही गोष्ट समजल्यावर ती शक्तिदेवाकडे आली. त्याला आपला शोक आवरण्यास सांगून ती म्हणाली, " महाराज ! आज मी आपणांस सर्व कांहीं सांगतें. आम्ही तिघी बहिणी पूर्वी कनकपुरींत होतों. पण मुनीच्या शापामुळें आम्हांला मृत्युलोकांत जन्म घ्यावा लागला. त्यांपैकीं वर्धमानपुरींतील कनकरेखा शापमुक्त झाल्याचें आपणांस माहितच आहे. बिंदुरेखाहि माझीच बहीण होती. तीहि आपणाला हें दिव्य शस्त्र देऊन आज शापांतून मुक्त झाली आहे व कनकपुरीस गेली आहे. आपण विद्याधर बनल्यानंतर मीहि शापमुक्त झालें आहें. मलाहि आतां कनकपुरीला गेलें पाहिजे. आमची सर्वांत वडील बहीण कनकप्रभा आम्हां तिघींच्या शरिरांचें रक्षण करीत कनकपुरींत असते. या दिव्य खड्गाच्या प्रभावानें आपणाला विद्याधराचें स्थान लाभलें आहे. आपण लवकरच कनकपुरीस यावें व आम्हां सर्वांचा विधिपूर्वक स्वीकार करावा." बिंदुमति असें बोलून एकाएकीं अंतर्धान पावली. आपल्या सर्व श्रमांचा शेवट अशा रीतिनें गोड झालेला पाहून शक्तिदेवाला आनंद वाटला. दैवयोगाचें कौतुक करीत आकाशमार्गानें तो कनकपुरींत आला.

• • •

## शक्तिदेवास विद्याधरांच्या राज्याची प्राप्ति

कनकप्रभेनें त्याचें मोठ्या समारंभपूर्वक स्वागत केलें. त्याला आपल्या महालांत नेऊन आपल्या बहिणींची ओळख करून दिली. ती म्हणाली, " महाराज ! आपण वर्धमानपुरींत जी कनकरेखा पाहिलीत ती ही माझी चंद्ररेखा नांवाची बहीण आहे. उत्स्थलद्वीपावर ज्या बिंदुमतीशीं आपण प्रथम विवाह केला ती ही माझी शशिरेखा नांवाची

दुसरी बहीण आहे व दानवानें पळविलेल्या बिंदुरेखा नांवाच्या ज्या राजकन्येशीं आपण तेथेंच विवाह केला, ती ही शशिप्रभा नांवाची माझी तिसरी बहीण आहे. आमच्या वडिलांनीं आमच्या विवाहाला पूर्ण संमति दिली आहे. आतां आपण आमच्या वडिलांकडे चलावें व तेथें आम्हां सर्वांचाविधिपूर्वक स्वीकार करावा." शक्तिदेवानें तिची ही विनांति मान्य केली. सर्वजण वनांत शशिखंड विद्याधराकडे आले. त्यानें आपल्या चारी मुली विधिपूर्वक शक्तिदेवाला अर्पण केल्या आणि सर्व विद्या त्याला देऊन त्याला अजिंक्य विद्याधर बनविलें. आपलें सर्व राज्य त्याला देऊन तो शक्तिदेवाला म्हणाला, "शक्तिदेव ! लवकरच वत्सराज उदयनाला नरवाहनदत्त नांवाचा पुत्र होणार असून, तो सर्व विद्याधरांचा सम्राट् होणार आहे. त्याच्या सेवेला मात्र तुम्ही नेहमीं सिद्ध रहा." असें म्हणून शशिखंडानें सर्वांना निरोप दिला. शक्तिदेव आपल्या चारी पत्न्यांसह कनकपुरींत येऊन सर्व सुखांचा आस्वाद घेत आनंदांत काळ कंठूं लागला.

IRBK-0106262